# ठाणे महानगरपालिका,ठाणे

**जाहिरात (संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)**

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सार्वजनिक आरोग्य विभागाकडील **वैद्यकीय अधिकारी** या संवर्गातील रिक्त पदे नियमित वेतनश्रेणीत भरण्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांनी ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने त्यांचे अर्ज दि. ०५/१०/२०१८ ते दि.१४ /१०/२०१८ रोजीचे रात्रौ २३.५९ वा. पर्यंत संपूर्ण तपशीलासह भरावीत व अर्जात नमूद केलेली प्रमाणपत्रे अपलोड करावीत. अर्जासोबत नमुद केलेली प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच पोस्टाद्वारे अथवा हस्ते प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यांत येणार नाही.

१) पदनाम :- वैद्यकीय अधिकारी (वर्ग १)

२) वेतन बँड अधिक ग्रेड पे :- रु.१५६००-३९१०० अधिक ग्रेड पे रु.५४००/-

३) शैक्षणिक अर्हता, अनुभव :- मान्यताप्राप्त विद्यापीठाची एमबीबीएस पदवी, अनुभवास प्राधान्य

४) पदसंख्या :- **२०**

५) अनुशेष/आरक्षण :-

| अ.क्र. | तपशील | अनु.जाती १३% | अनु.जमाती ७% | विजा/भज अ ३% | विजा/भज ब २.५% | विजा/भज क ३.५% | विजा/भज ड २% | विमाप्र २% | इमाव १९% | खुला ४८% | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भरावयाची पदे | - | ०१ | - | - | - | - | - | ०९ | १० | २० |
| | समांतर आरक्षण | | | | | | | | | | |
| २. | सर्वसाधारण | - | ०१ | - | - | - | - | - | ०६ | ०७ | १४ |
| ३. | महिला ३०% | - | - | - | - | - | - | - | ०३ | ०३ | ०६ |

## १. वयोमर्यादा :-

१ उपरोक्त पदांसाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे वय अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक राहील. तसेच शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या १२, दि.२५/०४/२०१६ नुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील.

२ शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००२/३७९/प्र.क्र.२२/०२/१२, दि.१ नोव्हेंबर २००३ नुसार नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शासन सेवतील अधिकारी/कर्मचारी यांचे करीता वयाची अट पदाच्या विशेषज्ञतेनुसार व आवश्यकतेनुसार वयाच्या ४५/५० पर्यंत राहील.

## २. शैक्षणिक अर्हतेबाबतच्या अटी व शर्ती :-

१ प्रस्तुत जाहिरातीत नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव उमेदवाराने जाहिरातीच्या दिनांकास प्रमाणपत्रांसहीत पुर्ण धारण करणे आवश्यक आहे.

२ उमेदवाराने महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल ॲक्ट, १९६५ (महाराष्ट्र XLVI, १९६५) किंवा इंडियन मेडिकल कौन्सिल ॲक्ट, १९५६ (१९५६ चा १०२) नुसार त्याचे/तिचे नांव नोंदविणे अनिवार्य आहे.

३ विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या विद्यापीठ/अभिमत विद्यापीठ (Deemed University) अथवा विद्यापीठ अनुदान आयोग अथवा (AICTE) ने मान्यता दिलेल्या स्वायत्त संस्थामधील शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

## ३. सामाजिक व समांतर आरक्षण :-

१ जातीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ उमेदवाराने महाराष्ट्र अनु.जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास वर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतूदींनूसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२ उमेदवाराने अर्जामध्ये जात प्रवर्गाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

३ इतर मागासवर्गाचा दावा करणा-या (या प्रवर्गातील समांतर आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांसह) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

४ शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र सीबीसी-२०१३/प्र.क्र. १८२/ विजा/भज-१. दिनांक १७/०८/१३, अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत व प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

५ समांतर आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.एस.आर.व्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि.१३/०८/२०१४ अन्वये आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

६ समांतर आरक्षणांतर्गत राखीव असलेल्या पदांकरीता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्याच सामाजिक प्रवर्गातून समांतर आरक्षणविरहित म्हणून भरली जातील.

## ४. महिला आरक्षण:-

१ महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्र ८२/२००१/मसेअ २००० /प्र.क्र.४१५/का-२, दि.२५/५/२००१ आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२ महिलांचे आरक्षण हे त्या त्या प्रवर्गासाठी संमातर आरक्षण राहील. तथापि भरतीच्या वर्षात महिलांकरिता आरक्षित पदांसाठी त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत, तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या सामाजिक प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

३ खुल्या प्रवर्गातील उमेदवारांपैकी उन्नत आणि प्रगत व्यक्ती/ कुटंबातील (क्रिमी लेअर) महिला सदस्यांना

महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील विमुक्त जाती/ भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटुंबातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

४ महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या महिला अमेदवारांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

५ खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदांसाठी दावा करणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी महानगरपालिकेतर्फे जाहिरात ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च) दिलेली आहे त्या वर्षाच्या लगत पूर्वीच्या वित्तीय वर्षातील, क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले खुल्या प्रवर्गातील महीलांकरीताचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. त्यापुर्वीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.

## ५ निवड पध्दतः-

१

| तपशील | गुणांचे प्रमाण (एकुण १०० गुण) |
|---|---|
| पदवी (एम.बी.बी.एस.) परीक्षेच्या सर्व वर्षांमध्ये मिळालेले सरासरी गुण | जास्तीत जास्त ६० गुण |
| शासन सेवेत वैद्यकीय अधिकारी या पदावर अस्थायी किंवा बंधपत्रित स्वरुपात केलेली एकुण सेवा | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ४ गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ३ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |
| पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन झालेला कालावधी (शासन सेवेचा कालावधी वगळून) | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |

वरील तक्त्यांतील गुणांचे व २० गुणांचा मुलाखतीचे भारांक (Weightage) (८०:२०) याप्रमाणे घेऊन प्राप्त गुणांच्या आधारे गुणानुक्रमे अंतिम निवडसूची तयार करण्यात येईल.

२ शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१०१०/३९०/प्र.क्र..३६६/सेवा-३, दिनांक १९ जून, २०१० अन्वये आदिवासी भागातील आरोग्य संस्था घोषित करण्यात आल्या असून तेथे बंधपत्रित / कंत्राटी / अस्थायी वैद्यकीय अधिकारी म्हणून केलेल्या कामाचा अनुभव मूल्यांकनासाठी विचारात घेण्यात येईल.

३ उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधित संस्था/ कार्यालय यांचे प्रमुख हे सक्षम प्राधिकारी असतील.

४ उमेदवाराची सेवा ही प्रत्येक सहामाही मध्ये मोजण्यात येईल. सहा महिन्यापेक्षा कमी सेवेसाठी गुण देण्यात येणार नाहीत.

५ अनुभवासाठीच्या गुणांच्या मूल्यांकनासाठी ३१ ऑगस्ट, २०१८ हा अंतिम दिनांक राहील.

६ निवड प्रक्रियेसाठी विहित करण्यांत आलेल्या निकषानुसार गुणांचे मूल्यांकन करण्यासाठी सर्व गुणपत्रके/ प्रमाणपत्रे यांच्या स्वसाक्षांकीत प्रती उमेदवाराने अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवाराचा अर्ज रद्दबातल होऊ शकेल.

७ प्राप्त अर्जांची छाननी करुन विहीत कार्यपध्दतीनुसार पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात

येईल.

८ प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या संख्येच्या तीनपट या प्रमाणात उच्चतर गुणवत्ताधारक उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल.

९ मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांची यादी ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी सदरचे यादीमध्ये स्वत:चे नाव तपासून मुलाखतीस उपस्थित रहावे. तसेच उमेदवारांना त्यांच्या ईमेलवर व भ्रमणध्वनीवर मुलाखतीचा दिनांक, वेळ व ठिकाण कळविण्यात येईल.

१० समान गुण असणा-या उमेदवांराचा गुणवत्ता क्रम, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं/१२१५/(प्र.क्र.५५/१५)/१३-अ,दि.०५/१०/२०१५ मधील नमूद केलेल्या निकषावर लावला जाईल.

११ उमेदवारांना वरील अनुक्रमांक ५ (१) नुसार मिळालेले गुण व मुलाखतीमध्ये मिळालेले गुण या आधारे (८०:२०) प्रमाणे अंतिम निवडसूची तयार करण्यात येईल. मा.महासभेच्या मान्यतेस अधिन राहून सदर अंतिम निवडसूची ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

**६. सूचना:-**

१ वरील प्रवर्गनिहाय पदसंख्या व आरक्षण यामध्ये बदल/वाढ होण्याची शक्यता असून त्याबाबतचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना राहतील.

२ ऑनलाईन पध्दतीशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज स्वीकारण्यासाठी विहीत केलेला दिनांक व वेळेनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

३ महाराष्ट्र शासन, केंद्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर शासकीय / निमशासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यापुर्वी आपल्या विभाग / कार्यालय प्रमुखांची पुर्व परवानगी घ्यावी व तसे ना हरकत प्रमाणपत्र, प्रत्यक्ष कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४ अर्ज करणा-या उमेदवारांनी जाहिरातीचे दिनांकास, पदाच्या आवश्यकतेप्रमाणे शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर सर्व अर्हता धारण करणे / अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

५ उपरोक्त पदांसाठी विहित केलेले अर्ज www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर दि. ०५/१०/२०१८ ते १४/१०/२०१८ रोजीचे रात्रौ २३.५९ वा. पर्यंत उपलब्ध होतील. या कालावधीतच अर्ज सादर करणे आवश्यक राहील. तद्नंतर Link उपलब्ध राहणार नाही.

६ सेवायोजन कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प येथील नोंदणीकृत उमेदवारांनी वरील मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.अथवा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

७ पात्रता / आरक्षणासंदर्भात अर्जामध्ये निर्विवादपणे दावा केलेला असणे आवश्यक आहे. अर्जामध्ये प्रत्येक दाव्याच्या पुष्टयर्थ आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता/ आरक्षणाचा दावा ग्राह्य समजला जाणार नाही.

८ नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र आवश्यक असणा-या प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटाबाहेरील आहेत असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. असे नमूद केलेल्या उमेदवारांनी महानगरपालिकेतर्फे जाहिरात ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च) दिलेली आहे त्या वर्षाच्या लगत

पूर्वीच्या वित्तीय वर्षातील, क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. त्यापुर्वीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही. अर्जामध्ये उन्नत व प्रगत गटाबाहेरील नाही असे नमूद केले असल्यास, नंतर सादर करण्यात आलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र निवडीसाठी ग्राहय धरले जाणार नाही.

९ उमेदवाराने अर्जामध्ये स्पष्टपणे **होय** (yes) असे नमूद केले असल्यास कागदपत्र पडताळणीच्या दिनांकांपर्यंत निर्गमित केलेले अधिवास प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र निवडीसाठी ग्राहय धरण्यात येईल. अर्जामध्ये संबंधित बाबींचा/ आरक्षणाचा स्पष्टपणे उल्लेख/दावा केलेला नसल्यास, तदनंतर अथवा मुलाखतीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रांचा/ प्रमाणपत्रांचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही. व त्याबाबतच्या तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

१० सामाजिक आरक्षण , समांतर आरक्षण, नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र, अनुभव पात्रता इत्यादी संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या/ येणा-या शासन निर्णयाप्रमाणे अमंलबजावणी करण्यात येईल.

११ अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे अधिवास प्रमाणपत्र अर्जदाराने कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल. अर्जदाराकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. परंतू सदर जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला यांमध्ये अर्जदाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

१२ उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल.अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत.

१३ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर, उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्यांचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१४ महापालिकेने निश्चित केलेल्या दिनांकास व ठिकाणी पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१५ मुलाखत व कागदपत्र तपासणीच्या वेळी उमेदवाराने स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणुक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची स्वस्वाक्षांकित (Self Attested) छांयाकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

१६ कागदपत्रे पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा , अधिवास प्रमाणपत्र ,समांतर आरक्षणाबाबतचा दावा, इ.बाबतची सर्व मूळ कागदपत्रे व त्याची प्रत्येकी एक साक्षांकित प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरिता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास उमेदवार निवडीसाठी अपात्र होऊ शकेल व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१७ निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व

निवासस्थान देण्याची जबाबदारी महापालिका प्रशासनाची राहणार नाही याची नोंद घ्यावी.

१८ या भरतीप्रक्रिये संदर्भातील माहिती व सूचना ठाणे महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया www.thanecity.gov.in ही वेबसाईट उमेदवारांनी वेळोवेळी पहावी.

१९ उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतुदी मा. आयुक्त ठाणे महानगरपालिका यांचे कडुन कोणत्याही क्षणी पूर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता आहे. सदर बदल आवश्यकतेनूसार निदर्शनास आणण्यात येतील व ते संबंधितांवर बंधनकारक असतील. असे बदल, प्रसिध्दी पत्रक, इत्यादी सर्वसाधारणपणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. त्याकरिता उमेदवाराने वेळोवेळी महानगरपालिकेचे वेबसाईटचे अवलोकन करणे त्यांच्या हिताचे राहील.

२० महानगरपालिकेने वेळोवेळी घेतलेले निर्णय संबंधितांवर बंधनकारक असतील.

२१ भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त ,ठाणे महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित करण्याचे अधिकार मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

## ७. इतर सर्वसाधारण अटी/ शर्ती :-

१ उपरोक्त पदांकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/ प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/०३/२००३ नुसार संगणक हाताळणीबाबतची शासनाने विहित केलेले प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल. माहिती व तंत्रज्ञान (साप्रवि) विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ०४/०२/२०१३ मध्ये विहित केलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना सगंणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

२ निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्वावर नियुक्तीनंतर ठाणे महानगरपालिका सेवा विनियम लागू होतील.

३ निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महाराष्ट्र शासन , वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/सेवा -४ दि.३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृती योजना (Defined Contribution Pension System) लागु राहील.

४ शासन निर्णय क्र. चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दि.२८/०८/२०१७ मधील तरतूदीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात चारित्र्य पडताळणीच्या अधीन राहून ६ महिन्याच्या कालावधीकरीता निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल. मात्र ६ महिन्याच्या कालावधीत चारित्र्य पडताळणीचा अहवाल प्राप्त न झाल्यास अथवा त्यांच्या चारित्र्य पडताळणीचा अहवाल असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती कोणतेही कारण न देता समाप्त करण्यात येईल.

५ मागासवर्गीय उमेदवारांकरीता आरक्षीत असलेल्या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास उमेदवाराची ६ महीन्याच्या कालावधीकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येईल. मात्र ६ महिन्याच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास त्यांची नियुक्ती कोणतेही कारण न देता समाप्त करण्यात येईल.

६ महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र. एस.आर.व्ही-२०००/प्रक्र१७/२०००/२०१२ दि. १/०७/२००५ नुसार लहान कुटुबांचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

७ नियुक्ती नंतर उमेदवाराची महापालिकेच्या किंवा / शासकीय रुग्णालयामार्फत / वैद्यकीय मंडळामार्फत वैद्यकिय तपासणी केली जाईल व त्यामध्ये वैद्यकीय दृष्टया अपात्र असल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

८ उमेदवारांस मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

९ सदर भरती अंतर्गत नियुक्ती दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी (नैमत्तिक रजा सोडून अन्य कोणत्याही रजेचा/अनुपस्थितीचा कालावधी वगळून ) असेल व दोन वर्षानंतरचे सेवासातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

१० नियुक्ती झालेल्या उमेदवारांची ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही रुग्णालय/आरोग्य केंद्रात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महानगरपालिकेच्या कोणत्याही रुग्णालय/आरोग्य केंद्रात बदली योग्य असेल. उमेदवारांना रुग्णालयाच्या आवश्यकतेनुसार विविध विभागात काम करावे लागेल.

११ नियुक्ती झालेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. परंतु त्यांना नियमानुसार व्यवसाय रोध भत्ता अनुज्ञेय राहील.

## ८. अर्ज सादरीकरण :-

१ www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर New links (नवीन माहिती) या सदराखाली ऑनलाईन अर्जाची लींक उपलब्ध होईल. Link for Applying for the post of Medical Officer (वैद्यकीय अधिकारी या पदासाठी अर्ज करण्यासाठी लिंक) या लिंकवर अर्जदाराने क्लिक करावे. जाहिरातीद्वारे प्रसिध्द केलेल्या पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.

२ ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या पदाच्या उजवीकडे असलेल्या ‘Apply‘ या ठिकाणी क्लिक करावे. त्यानंतर भ्रमणध्वनीची वैधता तपासण्यासाठी माहिती भरावी. `send OTP` वर क्लिक केल्यावर अर्जदाराच्या भ्रमणध्वनीवर आलेला OTP क्रमांक नमुद करुन अर्ज भरण्याची पुढील कार्यवाही करावी.

३ अर्जदाराचे भ्रमणध्वनीवर युजर आयडी व पासवर्ड प्राप्त होईल. त्यास जतन करावे.

४ अर्ज यशस्वीरित्या सादर झाल्यानंतर तुमच्या अर्जाची प्रींटआऊट काढून घ्यावी.

## ९. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :-

१ उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी. भरावयाची सर्व माहिती आपलेकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच आपला अर्ज भरावा. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारले जातील.

२ अर्जात हेतूपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे गैरप्रकार करणा-या उमेदवारांना गुण कमी करणे, निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करण्याचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

३ उमेदवाराने ऑन लाईन अर्ज भरल्यानंतर सबमिट केल्यावर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

४ वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल.

५ एस.एस.सी./मॅट्रीक्युलेशन अथवा शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला या प्रमाणपत्रावरील जन्मदिनांकानुसार अर्जामध्ये जन्मदिनांक निवडावा. स्त्री/पुरुष संदर्भात संबंधित पर्याय निवडावा. तसेच अमागास प्रवर्ग (खुला), मागासप्रवर्ग, नॉन-क्रिमिलेअर, महिला, इत्यादि संदर्भात लागू असलेली माहिती निवडावी

६ शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती, दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

७ गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी.

८ फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :-

उमेदवाराने स्वतःचे छायाचित्र / फोटो (रुंदी ३.५से.मी. x उंची ४.५ से.मी.) व स्वतःची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी.

- एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकीत करु नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवून स्कॅन करता येईल.
- फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.




- छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते मुलाखतीच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.
- विहित आकार / क्षमतेप्रमाणे काळ्या शाईच्या पेनाने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी.
- उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.अन्य कोणत्याही व्यक्तिने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही.
- वरील प्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी.संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.
- फोटो व स्वाक्षरीची प्रत्येकाची संपूर्ण इमेजची स्कॅन करुन pdf फॉरमेटमध्ये संगणकावर वेगवेगळ्या फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (Save) करावी. फोटो तसेच स्वाक्षरी इमेज प्रत्येकी २०० kb पेक्षा जास्त असता

कामा नये. या पेक्षा जास्त क्षमतेची इमेज प्रणालीवर स्विकारली जात नाही. इमेजची साईज २००kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dpi resolution, no.of colours etc. द्वारे स्कॅनिंगच्या वेळी setting Adjust करावे.

- स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरतांना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९ नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वतः:च करणे आवश्यक आहे.

१० संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. अर्जातील संपूर्ण माहिती CAPITAL LETTERS मध्ये भरावी. संक्षिप्तपणे (Abbrevations) वा अद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नांव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या / पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

११ महिला उमेदवारांनी पुर्वाश्रमीच्या नावाने ( By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

१२ एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावांत कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास,त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

१३ पत्रव्यवहाराचा स्वतः:चा पत्ता लिहावा. व्यवसायीक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र/वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा/संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देऊ नये.

१४ आवश्यक प्रमाणपत्रे/ कागदपत्रे अर्जासोबत अपलोड न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्जामधील दावा/माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्याने उमेदवारी रद्द होवू शकते.

१५ उमेदवाराने अर्जात स्वतः:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चूकल्यास त्यास केवळ उमेदवार जबाबदार राहील.

१६ पूर्णतः माहिती भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट काढून घ्यावी. प्रिंट काढलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी. अर्जाची प्रिंट मुलाखतीच्या वेळी तसेच कागदपत्र तपासणीच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

१७ आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्याशिवाय उमेदवार निवडीस पात्र राहणार नाही. केवळ मुलाखत दिल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी संबंधित पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

१८ भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्या अनुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल, या व्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाद्वारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१९ विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही.

२० ऑनलाईन प्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार असल्यास ७३५८७१२४१४ या भ्रमणध्वनी क्रमांकावर सोमवार ते रविवार सकाळी ०९.०० ते रात्रौ १०.०० या वेळेत संपर्क साधावा किंवा अर्ज भरण्यासंबंधी ई-मेल पाठविल्यानंतर उमेदवारांना त्यांच्या अडचणीचे निराकरण करुन उमेदवारांच्या भ्रमणध्वनीवर किंवा ई-मेर्ल आयडीवर संदेश पाठविण्यात येईल. उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी अचूकपणे भरणे अनिवार्य आहे.

२१ उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक अंतिम निकाल लागेपर्यंत कार्यरत असणे आवश्यक आहे.उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा / अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील, तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनीवर संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना ठाणे महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. मुलाखतीबाबतचा संदेश ई-मेल/एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल. एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वतःचा ई-मेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

२२ उमेदवाराने अर्ज सादर करतांना न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम कारवाईसंबंधीची माहिती देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराची सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२३ जे अर्जदार मुलाखतीसाठी पात्र ठरणार नाहीत अशा अर्जदारांना याबाबत वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही आणि अर्जदारास त्याबाबत विचारणा करता येणार नाही. त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार इकडून केला जाणार नाही.

२४ उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

२५ ऑनलाईन अर्ज भरताना एकाचवेळी अनेक ठिकाणाहून इच्छुक उमेदवार अर्ज भरत राहिले तर तांत्रिक अडचणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी उमेदवारांनी अंतिम कालावधीची वाट न पाहता लवकरात लवकर अर्ज सादर करावा. याबाबत उमेदवारांस अर्ज सादर करण्यासाठी कोणतीही वाढीव मुदत देण्यात येणार नाही. तसेच यासंबंधी कोणतीही तक्रार दाखल करता येणार नाही. अशा तक्रारींचा दखल घेतली जाणार नाही.

## १०. विशेष सूचना :-

१ पदभरतीच्या अटीशर्तींमध्ये परिस्थितीनुसार बदल करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना राहतील.

२ महापालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे /अभिलेखे ही महापालिकेच्या अभिलेखाचा भाग होईल.

३ जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

४ मध्यस्थ/ठग/ठाणे महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

५ यापुर्वी सदर पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरुन पुन्हा अर्ज करणे आवश्यक आहे. पूर्वी काही अर्ज केले असतील तरी सुध्दा असे पूर्वीचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

६ उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चूकीची माहिती / तपशिल देऊ नये, खोटी माहिती तथा खोटा तपशील तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑन लाईन अर्ज भरतांना दडवून ठेवू नये.

Sd/-

ठिकाण : ठाणे
दिनांक : ०५/१०/२०१८

उपआयुक्त (मुख्यालय)
ठाणे महानगरपालिका,ठाणे